## मी सर्वज्ञ

खुळ्या कुणाचे ,प्रश्न बावळे, वेडे किती हे अजाणते ?
उत्तर फेकुनी आनंदाने, भुवई माझी बघ उडते ||
कसे कुणाला समजत नाही,मलाच माझा प्रश्न पडे
मी अवतरलो अवनी वरती, घेऊनि सारे ज्ञान-घडे ||
कुणी विचारा,काही विचारा, माझी बुद्धी ठाम असे
ना विषयाचे बंधन मजला, तुम्हीच ठरवा काम कसे ||
शब्द न पडले, वाद न घडले, हे तर नित्याचे झाले
मी न ऐकले कधी कुणाचे,जरी कोणाला नावडले ||
मला नसे माहित काही, असे इथे काहीच नाही
कसा गवसला, कुठे गवसला, 'देव-कण' ही सुटला नाही. ||
भिडस्त, नम्र मी मजला वाटे,माझे मन नाही खोटे
मी बापुडा जग उद्धारी, तुम्ही म्हणा अप्पलपोटे ||

**---संध्या रानडे**